स्कूल मास्टर
ओ दिलदार

राष्ट्रभावना जागृत करणारी ओजस्वी देशभक्तीपर गीते आणि आदर्श, मूल्ये जपणारी अर्थपूर्ण गाणी सातत्याने लिहिणाऱ्या एखाद्या श्रेष्ठ कवीच्या लेखणीतून जेव्हा असं खट्याळ छेडछाडीचं प्रणय गीत निर्माण होतं तेव्हा त्याची रंगत काही औरच असते. ज्येष्ठ कवी प्रदीपनं हे उत्फुल्ल गाणं लिहून आपणही अशी गाणी किती लीलया लिहू शकतो याचा जणू वस्तुपाठच इथं घालून दिलाय. संगीतकार वसंत देसाईंनी त्याला दिलेली तशीच ओघवती चाल आणि लता-लताचा आवाज या सर्व गोष्टींचा सुरेख मेळ या गाण्यात एवढा छान जमून आलाय की हे गाणं ठाऊक नसलेला रसिक सापडणं मुश्कील व्हावं!

चित्रपटाचं नाव 'स्कूल मास्टर' म्हटल्यावर त्याची कथा काय असणार याची कल्पना कोणालाही करता येईल. कुठल्याशा गावात असलेली एक प्राथमिक शाळा आणि तिचा ध्येयवादी हेडमास्टर रामप्रसाद (बी. आर. पंथलू) हाच कथेचा केंद्रबिंदू आहे. घरात सीता (एम. व्ही. राजम्मा) ही प्रेमळ पत्नी आण रवि, गोपी नि गौरी ही तीन मुले. रामप्रसादचं आपल्या शाळेवर नितांत प्रेम. वर्गातल्या मुलांवर चांगले संस्कार घडविण्यासाठी त्याने घेतलेले कष्ट, वासू नावाच्या महावात्रट मुलावर त्याने जातीने लक्ष घालून त्याच्यात घडवून आणलेला आमूलाग्र बदल वगैरे वगैरे. म्हणूनच रामप्रसादला गावात आदराचं नि मानाचं स्थान प्राप्त झालंय.

असं सगळं आलबेल चाललं असताना एक अघटित घटना घडते. गावचा श्रीमंत जमीनदार आणि त्या शाळेचा नि पर्यायाने पंचायतीचा प्रमुख असलेला भैरव (चरित्र अभिनेता उल्हास) त्या शाळेतील एका गरीब शिक्षकाला आपल्या जमाखर्चाच्या नोंदीसाठी बळजबरीने राबवून घेत असतो. त्या कामास तो नकार देताच त्याचा पगारच रोखून धरतो. सहा महिने पगार न मिळाल्याने हवालदिल झालेल्या त्या शिक्षकावरील अन्यायाला रामप्रसाद भर पंचायतीत वाचा फोडतो आणि भैरववर अपमानित व्हायची वेळ येते. रामप्रसादला तो पाण्यात बघू लागतो. रातोरात त्याचं घरच पेटवून देतो. नशिबाने रामप्रसादचं कुटुंब बचावतं. तेव्हा शाळेतील सगळे विद्यार्थी एकत्र येऊन प्रत्येक जण खारीचा वाटा उचलून आपल्या गुरूची वास्तू पुन्हा उभारून देतात.

रामप्रसादचं आणखी एक स्वप्न असतं. या प्राथमिक शाळेचं मोठ्या हायस्कूलमध्ये रूपांतर व्हावं. पण त्यासाठी आर्थिक बळाची गरज असते. तेव्हा रामप्रसाद आपल्या विद्यार्थ्यां[illegible] नृत्यना[illegible]चा खास प्रयोग आयोजित करतो. शाळेच्या नव्या इमारतीसाठी आवश्यक असलेली चौदा हजाराची रक्कम जमा होते. ती अर्थात[illegible] रामप्रसादच्या ताब्यात असते. परंतु अशिक्षित कावेबाज भैरवला हा सगळा अनाठायी खर्च वाटतो म्हणून तो ती रक्कम रामप्रसादच्या घरातून चोरतो. पोलीस चौकशीत भैरववर संशय बळावतो आणि आरोप सिद्ध होऊन त्याला सात वर्षाची शिक्षा होते.

दरम्यान, रामप्रसादची मुलं मोठी होतात. इकडे भैरवची मुलगी राधा (कामिनी कदम) वयात येते आणि रामप्रसादचा धाकटा मुलगा गोपी (जवाहर कौल)च्या प्रेमात पडते. दोघांचं लग्न होतं. थोरला रवि (करण दिवाण) कुणा कजाग बाईच्या (ललिता पवार) नखरेल मुलीवर (शकिला) फिदा होऊन तिच्याशी विवाहबद्ध होतो. आता रामप्रसादला आपली लेक गौरी (बी. सरोजादेवी) हिच्या लग्नाचे वेध लागतात. मग कुठून तरी एका महाकंजुष वरपित्याचं (डेव्हिड) नि त्याच्या वेंधळ्या बावळट मुलाचं (राजा गोसावी) स्थळ सांगून येतं. लग्नात हुंड्याची भलीमोठी रक्कम मागितली जाते तेव्हा आपलं राहतं घर रामप्रसाद भैरवकडे गहाण ठेवून थोडी रक्कम वरपित्याला देतो नि पोरीचं लग्न पार पाडतो.

अर्थात हा कंजुष पण गंमतीदार वरपिता जो[...] पूर्ण रक्कम मिळत नाही तोपर्यंत आपल्या पोराला त्याच्या नवपरिणित बायकोबरोबर बोलण्याचीही बंदी घालतो.

सगळी मुले आपापल्या संसारात रममाण झाल्यावर इकडे रामप्रसादही थकलेला असतो. त्याच्या त्या प्राथमिक शाळेचं आता हायस्कूल झालेलं असतं आणि रामप्रसाद



बॅनर: पद्मिनी पिक्चर्स (ए.
निर्माता/दिग्द: बी. आर. पं
गीतकार: प्रदीप
प्रदर्शन: शुक्र. ४ सप्टेंबर
संगीत: वसंत देसाई
कलाकार: बी. आर. पं
जवाहर कौल, शकीला,
गोसावी, डेव्हिड, अचला

गीते व गायक

१) आज अंधेरे में है इन्स
महेन्द्र कपूर/कोरस
२) आओ बहन भाई,
ललिता/ इंदू/ सरला/ कोर
३) ऐ हवाओ, ऐ दिशाओ
गीता दत्त/ साथी
४) तार तार बज रहा दिल
५) हा हा हो हो बोलो तो
६) ओ दिलदार बोले इक
७) आज सुनो हम गीत
८) हॅलो हॅलो, ओ मेरी
गीता दत्त
९) एक दो तीन गिन भा
मुखर्जी

निवृत्त होऊन पेन्शनर बनलेला. मग पुन्हा एकदा भैरवचे कुटिल विचार जागृत होतात. रामप्रसादकडून कर्जफेड न झाल्यामुळे भैरव त्याच्या घरावर टाच आणतो. रामप्रसादच्या मुलांनी स्वतंत्र बिऱ्हाड थाटल्यामुळे त्या वृद्ध पती-पत्नीवर बेघर व्हायची पाळी येते. तेव्हा रामप्रसाद धाकट्या मुलाकडे तर त्याची पत्नी सीता थोरल्या मुलाकडे विभागली जातात. तिथं या दोन म्हाताऱ्यांची अडगळ होऊन त्यांच्या सुनांकडून अपमानित जिणं जगण्याची पाळी येते.

ोलो एक बार

एल. एस. प्रॉडक्शन)

लू

१९५९

लू, एम. व्ही. राजम्मा, करण दीवाण,
कामिनी कदम, बी. सरोजादेवी, राजा
चदेव.

न, ज्ञान का सूरज चमका दे भगवान...

ाज घडी आई, हटा दो हर बुराई...

बताओ मेरी जानकी कहाँ गई... लता/

के सूरबहार का... लता/ मन्ना डे
ाहे तुमने जी चुराया... लता
ार... लता/ तलत महमूद
ा के गा रहे... कवि प्रदीप
मक छल्लो, आओ कर ले प्यार... रफी/

गिन, यह दुनिया बडी कठिन... आरती

शेवटी त्रासाला कंटाळून ती दोघं एकत्र येऊन दूर कुठंतरी निघून जाण्याचा विचार करीत असतानाच त्यांना अचानक एक पोलीस ऑफिसर भेटतो. रामप्रसाद त्याला ओळखत नाही. पण तोच त्यांना 'मी तुमचा वात्रट विद्यार्थी वासू' अशी ओळख करून देतो. आपल्या पितृतुल्य गुरूची अशी अवस्था पाहून त्याला वाईट वाटतं आणि गुरुदक्षिणा म्हणून तो त्या दोघा उभयतांना त्यांच्या मूळ घरी घेऊन येतो. कारण भैरवकडून त्याने ते आधीच विकत घेतलेलं असतं.

चित्रपटाची प्रदीर्घ लांबी आणि टिपिकल मद्रासी बटबटीतपणा ठायी ठायी जाणवत असूनही वेगळ्या विषयामुळे 'स्कूल मास्टर' सुसह्य ठरतो. अर्थात निर्माते बी. आर. पंथलूनी आपल्या मराठीतील 'ऊन पाऊस' या गाजलेल्या चित्रपटावरून प्रेरणा घेऊन 'स्कूल मास्टर'ची कानडी भाषेत निर्मिती केली आणि त्या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्याचे हिंदीकरण करताना बी. आर. पंथलू आणि एम. व्ही. राजम्मा यांच्या संवादांचं डबिंग गजानन जागिरदार आणि लीला चिटणीस यांनी केलं होतं.

या 'स्कूल मास्टर'चा आणखी एक विशेष म्हणजे मध्यंतरापूर्वी शाळेच्या इमारत निधीसाठी विद्यार्थ्यांनी सादर केलेला रामायणातील सीतेच्या शोधाचा नृत्यनाट्य प्रवेश. त्यावेळी 'ऐ हवाओ, ऐ दिशाओ, मेरी जानकी कहाँ गयी...' या दीर्घ लांबीच्या गीताला आणि त्या प्रसंगाला दिलेलं संगीत हे वसंत देसाईंच्या प्रतिभाशाली स्वरविलासाचा उत्कृष्ट नमुना म्हणावा लागेल. शिवाय हा संपूर्ण नृत्यनाट्याचा प्रवेश गेव्हा कलरमध्ये चित्रित केल्यामुळे त्याचा आगळाच नेत्रसुखद परिणाम साधला गेलाय; परंतु असं असूनही रसिकप्रेक्षकांना मात्र त्यातल्या 'ओ दिलदार बोलो इक बार' या अवखळ गाण्यावरच जीव ओवाळून टाकावासा वाटला. पडद्यावर वेंधळा राजा गोसावी आणि याच चित्रपटातून हिंदी चित्रसृष्टीत आगमन करणारी दाक्षिणात्या तारका बी. सरोजादेवी या दोघांवर चित्रित झालेलं हे सुरेख द्वंद्वगीत काळाच्या ओघात आजही टिकून राहिलंय.

अर्थात आपल्या 'ऊन पाऊस'ची सर या 'स्कूल मास्टर'ला नक्कीच नाही आणि राजाभाऊ परांजपे नि सुमती गुप्ते यांच्या नैसर्गिक अविस्मरणीय सहजसुंदर अभिनयाची तर इथं तुलना न केलेलीच बरी. गंमतीचा भाग म्हणजे 'ऊन पाऊस'वरून काढलेल्या 'स्कूल मास्टर'ला राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्यावर 'ऊन पाऊस'ही त्या पुरस्कारासाठी पाठविण्यात आला तेव्हा 'या चित्रपटाची कथा इंग्रजी पटावरून चोरलीय' अशा सबबीवरपुरस्कार नाकारण्यात आला होता. आता बोला!

■ विजय शिंगोर्णीकर